अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | गुरुवार
२७.०८.२०२६
वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २०८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## प्रशिक्षणार्थी विमान कोसळलं, वैमानिक आणि प्रशिक्षणार्थी मृत्यूमुखी

### विमानात अचानक स्फोट अन नंतर कोसळलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – उत्तर प्रदेशातील कानपूर येथे एक प्रशिक्षण विमान कोसळले. या अपघातात वैमानिक आणि प्रशिक्षणार्थी यांचा मृत्यू झाला. आज (२७ ऑगस्ट) विमानाने उड्डाण केले आणि उड्डाणानंतर अवघ्या २० मिनिटांतच, सकाळी पावणे बारा वाजता गंगा बॅरेजजवळ ते कोसळले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, विमान समुद्रसपाटीपासून अंदाजे २५० फूट उंचीवर असताना हवेत अचानक डगमगले आणि नंतर खाली कोसळले. संपूर्ण विमानाचे तुकडे तुकडे झाले आणि त्याचे भाग दूरवर विखुरले गेले. मात्र, विमानाला आग लागली नाही.

अपघाताच्या व्हिडिओमध्ये विमान पूर्णपणे उद्धवस्त झालेले दिसत आहे. एक वैमानिक कॉकपिटजवळ अडकला. दुसरा वैमानिक विमानापासून थोड्या अंतरावर रक्ताच्या थारोळ्यात गंभीर अवस्थेत पडला. विमानातील एक आसनही तुटून पडले होते. पोलीस आणि प्रशासकीय पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी रक्ताने माखलेले पायलट सचिन भाटिया (गुजरात) आणि प्रशिक्षणार्थी अभिषेक पुजारी (कर्नाटक) यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

घटनास्थळी पोहोचलेले कानपूरचे पोलीस आयुक्त रघुबीर लाल म्हणाले, 'विमानाने चकेरी येथील गर्ग एव्हिएशन ट्रेनिंग सेंटरमधून उड्डाण केले आणि २० मिनिटांनंतर ३९ किलोमीटर अंतरावर ते कोसळले. पायलटला ३ हजार तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाला माहिती देण्यात आली आहे. त्यांचे पथक आता तपास करेल.

## पिंपळवंडी पीडित कुटुंबाच्या मदतीला उपमुख्यमंत्री पवार

### भावंडांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील पीडित कुटुंबियांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज निवासस्थानी जाऊन भेट घेत सांत्वन केले.

दरम्यान घटनेच्या दिवशी पोलीस अधिक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून दोषीवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे तात्काळ आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आर्थिक मदत कुटुंबाला देण्यात आली असून, पीडितेच्या भावंडांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतल्याचे सुनेत्रा पवार यांनी सांगितले. तसेच पीडित कुटुंबाच्या मागणीनुसार 'शबरी आदिवासी घरकुल योजने'अंतर्गत घर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच महिला व बाल विकास विभागाच्या 'मनोधैर्य योजने'अंतर्गत १० लाख रुपयांची मदत आज त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे देखील सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी सांगितले. पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून त्यांनी पीडित कुटुंबाला विश्वास देत, या प्रकरणाचा खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून दोषीला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही सुनेत्रा पवार यांनी दिली.

निष्पाप मुलीला न्याय मिळवून देणे आणि पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचेही सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. या कठीण प्रसंगी पीडित कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांना न्याय मिळेपर्यंत शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील अशी ग्वाही सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

घटना घडलेल्या वस्तीवर सुरक्षेच्या दृष्टीने आणि अखंड वीज उपलब्ध राहण्यासाठी सौर हायमास्ट बसविण्यात येतील. तसेच परिसरातील नागरिक, विशेषतः महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी योग्य त्या मोक्याच्या ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवून यंत्रणा तात्काळ कार्यान्वित करण्यात येईल,असे आश्वासन सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिले.

## थोडक्यात

### मानवासाठी ४० टक्के नोकऱ्या राखीव ठेवा: बिल गेटसब यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वॉशिंग्टन**– जगातील सध्या सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढला आहे. या एआयमुळे काम सोपे व वेगाने होईल, असे पाहिले जात होते. आता 'एआय'च्या प्रभावामुळे जगातील तंत्रज्ञ व उद्योगपती चिंतेत पडले आहे. भविष्यात मानवासाठी ४० टक्के नोकऱ्या राखीव ठेवाव्यात, असे आवाहन जागतिक उद्योगपती बिल गेटस?ब यांनी केले आहे. मायक्रोसॉफ्टचे सह–संस्थापक बिल गेट्स यांनी 'एआय'च्या भविष्याबाबत एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. ते म्हणाले की, जस–जसे 'एआय' व रोबोट अधिक सक्षम होतील.

## भारत नेपाळच्या मदतीला : 37.5 टन मदतसाहित्य रवाना

### १६० हून अधिक मृत्यू, ८०० जणांचा अद्याप ठाव नाही

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरामुळे मोठी जीवितहानी झाली असून, अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या संकटाच्या काळात भारताने नेपाळला मदतीचा हात पुढे केला आहे. भारताकडून ३७.५ टन मदतसाहित्य, औषधे आणि अन्नाची पाकिटे घेऊन दुसरे विमान नेपाळकडे रवाना करण्यात आले आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी 'एक्स'वर पोस्ट करत याबाबत माहिती दिली. भारत नेपाळच्या प्रशासनाच्या सतत संपर्कात असून, बचाव आणि मदतकार्यात पुढेही आवश्यक ती मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

भारताकडून दुसऱ्यांदा मदत भारताने यापू–र्वीही नेपाळला १० टन मदतसाहित्य पाठवले होते. नेपाळमधील भारतीय दूतावासाने हा मदतसाठा नेपाळचे संस्कृती, पर्यटन आणि नागरी विमान वाहतूक मंत्री खडका राज पौडेल यांच्याकडे सोपवला होता. 'भारत नेहमी नेपाळसोबत आहे,' असे भारतीय दूतावासाने त्यावेळी म्हटले होते. नेपाळला या कठीण परिस्थितीत शक्य ती सर्व मदत केली जाईल, असेही दूतावासाने स्पष्ट केले.


नेपाळमधील भोटेकोशी नदीच्या परिसरात अचानक आलेल्या महापुरामुळे मोठा विध्वंस झाला. वृत्तांनुसार, हिमस्खलनामुळे भोटेकोशी नदीला मिळणाऱ्या ल्हेंदे नदीचा प्रवाह अडला होता.

त्यानंतर मोठ्या प्रमाणावर पाणी अचानक खाली आले. चीनच्या सीमेजवळील रसुवागढी परिसरातील टिमुरे भागाला या पाण्याचा मोठा फटका बसला. त्यानंतर पाण्याचा प्रवाह स्याफ्रुबेसीच्या दिशेने पुढे गेला.

## महाराष्ट्रातील ८० जण अडकले : केवळ ४-५ जणांशीच संपर्क

### मंत्री महाजनांची माहिती : राज्य सरकारकडून हेल्पलाईन सुरू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरामुळे मोठी जीवितहानी झाली असून अनेक भागांतील संपर्क यंत्रणाही विस्कळीत झाली आहे. कैलास मानसरोवर यात्रेसह पर्यटनासाठी गेलेल्या भारतीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनेही यंत्रणा सतर्क केली आहे. महाराष्ट्रातून नेपाळला गेलेल्या सुमारे ८० पर्यटकांची माहिती राज्य सरकारकडे आली असून, त्यापैकी आतापर्यंत केवळ ४ ते ५ जणांशी संपर्क होऊ शकला आहे, अशी माहिती राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

८० पर्यटक नेपाळमध्ये अडकले गिरीश महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील सुमारे ८० पर्यटक सध्या नेपाळमध्ये अडकले आहेत. त्यापैकी केवळ ४ ते ५ जणांशी राज्य सरकारचा संपर्क झाला असून, उर्वरित पर्यटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या ८० पर्यटकांपैकी ५७ जण 'रिचा टूर्स अँड ट्रॅव्हल्स'च्या माध्यमातून नेपाळला गेले होते. पूरस्थिती गंभीर असल्याने महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारच्या संपर्कात आहे. अडकलेल्या पर्यटकांचा शोध घेऊन त्यांना सुरक्षित ठिकाणी आणण्यासाठी समन्वयाने प्रयत्न सुरू असल्याचे महाजन यांनी सांगितले.

महाराष्ट्र सरकारकडून २४ तास हेल्पलाइन नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या मदतीसाठी राज्य सरकारने मंत्रालयातील राज्य नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवला आहे. गिरीश महाजन यांनी 'एक्स'वर पोस्ट करत याबाबत माहिती दिली.

## आष्टापूरमध्ये ४० टन ऊस चोरी

### लोणी काळभोर पोलिसांकडून दोघांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – हवेली तालुक्यातील आष्टापूर गावातील शेतातून सुमारे ४० टन ऊस तोडून चोरी करणाऱ्या दोघांना लोणी काळभोर पोलिसांनी ताब्यात घेतले.

चोरलेला ऊस अंदाजे ८८ हजार रुपयांचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. मुंढवा परिसरात राहणारे अनिल कामठे यांच्या कुटुंबाच्या मालकीची आष्टापूर येथील गट क्रमांक ८२२ मध्ये शेतजमीन आहे. कामठे आणि त्यांचे दोन भाऊ मिळून या जमिनीची शेती करतात. शेतातील सुमारे ५५ गुंठे क्षेत्रात सात महिन्यांपूर्वी उसाची लागवड करण्यात आली होती. कामठे यांच्या आईची प्रकृती बिघडल्यामुळे ते आणि त्यांचे भाऊ मुंढवा येथील घरी गेले होते. या कालावधीत २० ते २३ ऑगस्टदरम्यान अज्ञात व्यक्तींनी ऊस मजुरांच्या मदतीने तोडून चोरून नेला. कामठे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



नगर परिषद मराठी विद्यामंदिर क्र.१ येथे

# वरूड केंद्राची शाळास्तरीय शिक्षण परिषद उत्साहात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – नगर परिषद मराठी विद्यामंदिर क्र.१ येथे नुकतीच नगर परिषद वरूड केंद्राची शाळास्तरीय शिक्षण परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेत शैक्षणिक गुणवत्ता वाढ, शासन निर्णय आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात भारतीय स्त्री शिक्षणाच्या जनकर्तृत्व मूर्ती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व




हारार्पण करुन करण्यात आली. या शिक्षण परिषदेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष तानाजी नाकट, मारोती धुर्वे, शिक्षण प्रशासन अधिकारी मिरा राठोड, विषय तज्ञ राजश्री ढोले, अर्चना भोकरे, सविता चाचरकर उपस्थित होते. परिषदे दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना विविध वक्त्यांनी खालील मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण माहिती दिली: केंद्र संसाधन गटाच्या पुनर्रचनेबाबत सविस्तर मिरा राठोड, निपुण भारत' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची स्टार निश्चिती करण्याच्या प्रक्रियेवर राजश्री ढोले, पालक-शिक्षक बैठक आढावा आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या विषयावर अर्चना भोकरे, 'प्रशस्त ॲप' बाबत उपस्थितांना तांत्रिक व महत्त्वाची सविता चाचरकर तर विद्यार्थ्यांच्या मुल्याधारित शिक्षणासाठी राबवल्या जाणाऱ्या 'मूल्यवर्धन' उपक्रमाबाबत राजू आमटे सविस्तर माहिती दिली.

संचालन शिक्षक दिनेश चव्हाण तर आभार विशाल दवंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका गीता धुर्वे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षिका वर्षा टिकस, कांचन पाखले, निधी थोर, शिक्षकेत्तर कर्मचारी गोपाल सोनुले, शोभा टिकस, सविता कवटकर आणि रेखा तिवस्कर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# गरज असेल तरच घराबाहेर पडा : महाराष्ट्रासह २६ राज्यांना १३ तास संकटाचे, हवामान खात्याचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – भारतीय हवामान खात्याने काळजात धडकी भरविणारा अंदाज व्यक्त केला आहे. या अंदाजानुसार गुरुवारी महाराष्ट्रासह २६ राज्यांना १३ तास संकटाचे असल्याचा अशारा दिला आहे.

या कालावधीत मुसळधार पाऊस, ताशी ८५ कि.मी. वेगाने वाहणारे वारे आणि दरडी कोसळण्याचा धोकाही वर्तविला आहे. गरज असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहनही हवामान खात्याने



केले आहे. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली आदी २६ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

काही राज्यांमध्ये ताशी ८५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यताही वर्तविली असून डोंगराळ भागात दरड कोसळणे आणि भूस्खलनाच्या घटना घडण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. गरज असेल तरच घरातून बाहेर पडा. घरातून बाहेर पडताना एकदा हवामानाचा अंदाज घेऊनच बाहेर पडा, असे हवामान खात्याने म्हटले आहे.

नाशिकला अलर्ट

दरम्यान, नाशिकला आज पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलेला आहे. शहर आणि परिसरात वेगवान वाऱ्यासह मध्यम सरींचा पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# शासकीय रुग्णालयातील रुग्ण व कर्मचाऱ्यांना फळांचे वाटप

## ईद मिलादुन्नबी निमित्त खिदमत फाऊंडेशनचा सेवाभावी उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – ईद मिलादुन्नबीच्या पावन निमित्ताने आनंदाचा उत्सव समाजातील गरजूंनाही अनुभवता यावा, या उदात्त हेतूने खिदमत फाऊंडेशनच्या वतीने शासकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांसह रुग्णालयातील कर्मचारी वर्गाला फळांचे वाटप करण्यात आले.

या सेवाभावी उपक्रमातून रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा, उपचारादरम्यान त्यांना आपुलकीची जाणीव करुन



देण्याचा तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. फाउंडेशनच्या सदस्यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांना ईद मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी खिदमत फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ईद मिलादुन्नबी हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नसून मानवता, प्रेम, दया आणि सेवाभावाची शिकवण आचरणात आणण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. समाजातील गरजूंसोबत आनंद वाटून घेणे हीच खरी ईद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

फळवाटपाच्या या उपक्रमाचे रुग्ण, त्यांच्या नातेवाईक तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी कौतुक करत खिदमत फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे स्वागत केले. 'मोहब्बत-ए-रसूल खिदमत-ए-इन्सानियत' या संदेशाला साजेसा हा उपक्रम ईद मिलादुन्नबीच्या निमित्ताने मानवतेच्या सेवेचा प्रेरणादायी आदर्श ठरला.

# प्रगती दिनेश कल्पेकर ठरली 'कौन बनेगा करोडपती'ची यशस्वी स्पर्धक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयात लिपिक-नि-टंकलेखक पदावर कार्यरत प्रगती दिनेश कल्पेकर हीने सोनी टिव्हीवरील 'कौन बनेगा करोडपती' या बहुचर्चित, सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धात्मक कार्यक्रमात विविध काठिण्यपातळ्या पार करीत प्रवेशित होऊन बिगबी अमिताभ बच्चन यांनी विचारलेल्या प्रश्नांना



उत्तरे देत तीन फेऱ्या पूर्ण करुन ५ लाखांचे मोठे बक्षिस पटकावले आहे.

वाचन, मनन आणि स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाचा छंद जोपासलेल्या प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रारंभी प्राथमिक प्रवेश फेरीत विविध कठीण चाचण्या व संगणकाद्वारे ठरपवोश्रू निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये प्रगती हीने मारलेली धडक अत्यंत कौतुकास्पद व लक्षवेधी ठरली. त्यानंतर केबीसीच्या चमूकडून संपर्क साधून तिला स्पर्धेसाठी बोलावले गेले. मागील आठवड्यात ही स्पर्धा खेळली गेली. प्रथम 'फास्टेस्ट बझर फर्स्ट' या चाळणी पद्धतीमध्ये केवळ काही मिलीसेकंदांचा फरकही कोणाची निवड होणार हे ठरवू शकतो.

त्यामुळे अंतिम निकाल हा केवळ ज्ञानावर नव्हे, तर वेळेचे अचूक भान, क्षणातील प्रतिक्रिया आणि काही प्रमाणात नशिबावरही अवलंबून असतो.

यातही ती अव्वल ठरली व बिगबीच्या समोरील 'हॉटसीट'ची ती मानकरी ठरली. प्रगतीच्या 'कौन बनेगा करोडपती' या स्पर्धेच्या चित्रीकरणाचे एपिसोड गुरुवार २७ ऑगस्ट आणि शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सोनी टीव्हीवर दोन भागात प्रसारित होणार आहेत. अमरावतीकर आपण सर्वांनी एपिसोड नक्की पाहावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

# मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमनाबाबत व्यापक मोहिम हाती घेणार : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा स्त्री रूग्णालयातील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमन यंत्रणा असावी, यासाठी पाहणी करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या गर्दीच्या ठिकाणी आगीचा प्रकार घडू नये, यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज फायर ऑडीट आणि फायर सेफ्टी ऑडीट, इतर उपाययोजनांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयात घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी उपायायोजना करण्यावर भर दिला. यासाठी जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापना आणि शासकीस कार्यालयांची येत्या आठ दिवसांत पाहणी करावी. यात प्रामुख्याने अग्निशमना बाबत उपाययोजना




सुचविण्यात याव्यात. तसेच या सूचना पुढील आठ दिवसात अंमलात आणाव्यात. यासाठी आस्थापनांना जबाबदार धरून त्यांच्याकडून अग्निशमन यंत्रणांची दुरूस्ती, देखभाल आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण दर महिन्याला देण्यात यावे. तसेच ही यंत्रणा संबंधित आस्थापनांना सोपविताना जबाबदारी निश्चित करण्यात यावी. जोखमीच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा स्वयंचलित मोडमध्ये ठेवण्यात यावी. तसेच याची नियमित देखभाल आणि दुरूस्ती करण्यावर भर देण्यात यावा. यात प्रामुख्याने स्वयंचलित यंत्रणा कार्यक्षम असल्याची खात्री करावी. अग्निशमन यंत्र वापराबाबत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी याचे प्रात्यक्षिक घेण्यात यावे. यातील सुरक्षा विषयक कामांमध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही.

रूग्णालयात विजेच्या नियंत्रित वापरा-वर असलेल्या वैद्यकीय उपकरणांना स्टॅबिलायझर जोडण्यात यावेत. तसेच स्मोक डिटेक्टर कार्यान्वीत होण्यासाठी या यंत्रणेची नियमीत देखभाल करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेच्या पाहणीसाठी शहरी भागात ५० आणि ग्रामीण भागात ५० टिम तयार करण्यात येतील. त्यानंतर त्यांच्या सूचनेनुसार अग्निशमनाबाबत सुधारणा करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.

# शासकीय, खासगी, धर्मादाय रुग्णालयांचे फायर ऑडिट : तातडीने कार्यवाही करण्याचे आरोग्य मंत्र्यांचे निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अमरावतीतील स्त्री जिल्हा रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाला आणि तीन नवजात शिशूंचा दुदैवी अंत झाला.

या घटनेनंतर राज्यातील सर्व शासकीय, खासगी व धर्मदाय आरोग्य संस्थांमधील फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा, इमारत बांधकाम तसेच रुग्णालयातील संबंधित यंत्राचे ऑडिट करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीतील रुग्ण स्थलांतरणाची तयारी आणि विद्युत सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आरोग्य विभागाने यापूर्वी विविध स्तरांवर परिपत्रके आणि मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

त्यानुसार सर्व आरोग्य संस्थांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांचे नियमित मूल्यांकन करून त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.

# विद्यार्थी वाहतूक की जीवघेणा प्रवास? पालकांच्या दक्षेतची गरज

## अनेक चालकांचे वाहतुकीच्या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शाळा-महाविद्यालयांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या ऑटो, स्कूल व्हॅन, बस तसेच इतर वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसविले जात असल्याचे अनेकदा दिसून येते. वाहनांमध्ये विद्यार्थ्यांची होणारी गर्दी आणि सुरक्षिततेच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष चिंतेचा विषय बनला आहे.



विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचविण्याच्या घाईत काही वाहनचालक वेगाने वाहने चालवितात. अनेक वाहनांमध्ये आवश्यक सुरक्षा साधनांची कमतरता असते. काही ठिकाणी वाहनांच्या दरवाज्यांवर लटकून किंवा वाहनाच्या क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवास करताना दिसतात. अशा परिस्थितीत एखादा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, हा मोठा प्रश्न आहे.

विशेष म्हणजे, पालकांनीही आपल्या पाल्यांच्या वाहतुकीबाबत अधिक जागरूक होण्याची गरज आहे. केवळ मुलगा किंवा मुलगी वेळेवर शाळेत पोहोचली पाहिजे, एवढाच विचार न करता तो प्रवास सुरक्षित आहे का? वाहनाची स्थिती कशी आहे? चालकाकडे आवश्यक कागदपत्रे व अनुभव आहे का? वाहनात क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी तर नाहीत ना? याचीही पालकांनी तपासणी करणे गरजेचे आहे. शाळा व्यवस्थापन, पालक, वाहनचालक आणि संबंधित प्रशासन या सर्वांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर नियमित तपासणी व कठोर कारवाई झाली तरच परिस्थितीत सुधारणा होऊ शकते.



वाहनांची फिटनेस तपासणी करण्यासाठी आरटीओ कार्यालयात स्वयंचलित यंत्रणा आहे, परंतु या सर्व गोष्टींची योग्यरीतीने तपासणी केली जाते का हे देखील पाहिले पाहिजे. प्रवासी वाहनचालकांकडे ट्रांसपोर्ट लायसन्स, बॅच बिल्ला तसेच गणवेश असणे अनिवार्य आहे. पालकांनी स्कूल बसच्या फिटनेस प्रमाणपत्राची शहानिशा करुन घ्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी (अजित पवार) जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक तुषार देशमुख यांनी केली आहे.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड परवडणारी नाही. त्यामुळे पालकांनीही जागे होण्याची वेळ आली आहेङ्कपोरं शाळेत पोहोचतात हे महत्त्वाचेच, पण ती सुरक्षितपणे घरी परततात की नाही, हे त्याहून महत्त्वाचे आहे.

शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बस, व्हॅन आणि ऑटोरिक्षाच्या फिटनेस प्रमाणपत्रांची तपासणी करण्याची जबाबदारी शाळा परिवहन समिती आणि पालकांची आहे. मात्र, ही प्रमाणपत्रे नियमितपणे नूतनीकरण केली जात नाहीत.

जिल्ह्यात अनेक प्रवासी वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रांचा अभाव आहे आणि तरीही ही वाहने रस्त्यावर धावत असतात. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या हजारो स्कूल बस, व्हॅन आणि ऑटोमध्ये फक्त काहीचा प्रमाणपत्र नुतनीकरण करणाऱ्या गाड्या आहेत. लोकांमध्ये हेच वाहन विमा नसल्याच्या ओरडाही आहे. यामुळे अपघाताची शक्यता अधिक वाढत आहे.

# संपादकीय

**स्वयंवर आणि यशासाठी स्वतःच प्रयत्न करावे लागतात.**

## डिजिटल फसवणुकीचा वाढता विळखा आणि नागरिकांची जबाबदारी

डिजिटल युगाने मानवी जीवन अधिक वेगवान, सुलभ आणि सुविधायुक्त केले आहे. मोबाईल बँकिंग, यूपीआय, नेट बँकिंग, ऑनलाइन खरेदी, ई-गव्हर्नन्स आणि सोशल मीडियामुळे व्यवहार काही क्षणांत पूर्ण होऊ लागले आहेत. मात्र, ज्या तंत्रज्ञानाने सुविधा दिल्या, त्याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्हेगारांनी नागरिकांना फसविण्याचे नवे मार्ग शोधले आहेत. आज डिजिटल फसवणूक ही केवळ आर्थिक गुन्ह्याची बाब राहिलेली नाही; ती सामाजिक विश्वास, वैयक्तिक सुरक्षितता आणि देशाच्या डिजिटल अर्थव्यवस्थेसमोरील मोठे आव्हान बनली आहे. त्यामुळे या वाढत्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी केवळ सरकार किंवा बँकांनीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारी ओळखणे तितकेच आवश्यक आहे. भारताने गेल्या काही वर्षांत डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. यूपीआय व्यवहारांनी जगात नवा विक्रम निर्माण केला आहे. किरकोळ विक्रेत्यापासून मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वच स्तरांवर डिजिटल पेमेंटचा वापर वाढला आहे. ग्रामीण भागातही स्मार्टफोन आणि इंटरनेट पोहोचल्यामुळे लाखो लोक डिजिटल व्यवहार करू लागले आहेत. परंतु, डिजिटल साक्षरता ज्या वेगाने वाढायला हवी होती, त्या तुलनेत ती कमी राहिल्याने अनेक नागरिक सायबर फसवणुकीचे सहज बळी ठरत आहेत. आज फसवणुकीच्या पद्धती अत्यंत चलाख आणि विश्वासार्ह वाटतील अशा बनल्या आहेत. कधी बनावट बँक अधिकारी बनून ओटीपी विचारला जातो, तर कधी 'केवायसी अपडेट करा' या नावाखाली बनावट लिंक पाठवली जाते. सोशल मीडियावर खोटे गुंतवणूक सल्ले, पार्ट-टाईम नोकरीच्या आमिषाचे संदेश, कुरिअर अडकल्याचे खोटे मेसेज, क्यूआर कोड स्कॅन करण्याची विनंती किंवा व्हॉट्सअॅपवर नातेवाईकाच्या नावाने पैसे मागण्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. आता तर कृत्रिम बुद्धिमत्ताच्या साहाय्याने आवाजाची नक्कल करून फोन करण्याचे प्रकारही वाढत आहेत. त्यामुळे फसवणूक ओळखणे अधिक कठीण होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण भागातील लोक, महिला आणि प्रथमच डिजिटल व्यवहार करणारे नागरिक अधिक धोक्यात आहेत. अनेकांना ओटीपी, पिन किंवा सीव्हीव्ही क्रमांक गोपनीय ठेवण्याचे महत्त्व पूर्णपणे माहिती नसते. काही वेळा विश्वासाच्या नात्याचा गैरफायदा घेतला जातो. 'तुमचे खाते बंद होणार आहे', 'लॉटरी लागली आहे' किंवा 'सरकारी योजना मिळणार आहे' अशा संदेशांमुळे लोक घाईघाईने माहिती देतात आणि काही क्षणांत त्यांच्या खात्यातील रक्कम गायब होते. या समस्येचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे गुन्हेगारांचे सतत बदलणारे तंत्र. पूर्वी ई-मेल फसवणूक अधिक होती; आता ती मोबाईल अॅप, सोशल मीडिया, व्हिडिओ कॉल आणि बनावट वेबसाइटपर्यंत पोहोचली आहे. काही फसवे अॅप्स मोबाईलमध्ये इन्स्टॉल झाल्यावर संपूर्ण फोनवरील माहिती चोरू शकतात. त्यामुळे केवळ संशयास्पद लिंक टाळणे पुरेसे नाही, तर प्रत्येक डिजिटल कृती करताना सावध राहणे आवश्यक झाले आहे. सरकार आणि विविध यंत्रणांनीही या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र (ख४उ), राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल, हेल्पलाइन क्रमांक १९३० आणि बँकांकडून दिले जाणारे सतर्कतेचे संदेश यामुळे नागरिकांना मदत मिळत आहे. अनेक बँका संशयास्पद व्यवहार त्वरित रोखण्याचा प्रयत्न करतात. पोलिसांच्या सायबर शाखाही अधिक सक्षम होत आहेत. परंतु, गुन्हेगारांची संख्या आणि त्यांचे बदलते तंत्र लक्षात घेता केवळ सरकारी उपाय पुरेसे ठरत नाहीत. म्हणूनच नागरिकांची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरते. डिजिटल सुरक्षिततेची सुरुवात स्वतःपासून करावी लागते. कोणत्याही परिस्थितीत ओटीपी, यूपीआय पिन, एटीएम पिन किंवा पासवर्ड कोणालाही सांगू नये. अज्ञात लिंकवर क्लिक करणे टाळावे. क्यूआर कोड स्कॅन करण्यापूर्वी तो पैसे मिळवण्यासाठी आहे की पाठवण्यासाठी, हे समजून घ्यावे. मोबाईल आणि बँकिंग अॅप्स नेहमी अधिकृत स्टोअरमधूनच डाउनलोड करावेत. दोन-स्तरीय सुरक्षा (ढ्‌- ऋरर्लीी अीींहशपींळलरींळेप) सुरू ठेवावी आणि नियमितपणे पासवर्ड बदलावा. एखादा व्यवहार संशयास्पद वाटल्यास तातडीने बँकेशी संपर्क साधून १९३० या हेल्पलाइनवर तक्रार करावी.डिजिटल साक्षरतेलाही तितकेच महत्त्व आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासन यांनी सायबर सुरक्षेबाबत नियमित जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती केली जाते, त्याच गांभीर्याने डिजिटल सुरक्षिततेबाबतही प्रशिक्षण दिले पाहिजे.

# रक्षाबंधन - एका धाग्यात गुंफलेले जन्मभराचे वचन

भारतीय संस्कृती ही सणांची संस्कृती आहे. प्रत्येक सणामागे एक कथा, एक परंपरा आणि एक भावना दडलेली असते. रक्षाबंधन हा असाच एक सण जो भाऊ-बहिणीच्या अतूट, निस्वार्थ प्रेमाचा प्रतीक आहे. श्रावण पौर्णिमेला येणारा हा सण केवळ एक धागा नाही, तर तो आहे जन्मभराच्या रक्षणाच्या वचनाचा.



**रक्षाबंधनाचा इतिहास आणि पौराणिक कथा**

रक्षाबंधनाच्या अनेक कथा सांगितल्या जातात. महाभारतात जेव्हा श्रीकृष्णाने शिशुपालाचा वध करण्यासाठी सुदर्शन चक्र सोडले, तेव्हा त्यांच्या बोटाला जखम झाली. हे पाहून द्रौपदीने आपल्या साडीचा पदर फाडून कृष्णाच्या बोटाला बांधला. त्या क्षणी कृष्णाने द्रौपदीला वचन दिले की, मी आयुष्यभर तुझे रक्षण करीन. आणि पुढे वस्त्रहरणाच्या वेळी कृष्णाने तेच वचन पाळले.

दुसरी कथा आहे राणी कर्णावती आणि सम्राट हुमायूंची. चित्तोडगडच्या राणी कर्णावतीने मुघल सम्राट हुमायूंला राखी पाठवून आपल्या राज्याच्या रक्षणासाठी मदत मागितली होती. हुमायूंनेही बहिण मानून तिचे रक्षण केले. यावरून राखीचा अर्थ फक्त रक्ताच्या नात्यापुरता मर्यादित नाही, तर तो मानवतेच्या नात्याचा आहे हे सिद्ध होते.

**राखीचा खरा अर्थ**

आजच्या काळात रक्षाबंधनाचा अर्थ बदलत चालला आहे. पूर्वी भाऊ बहिणीचे रक्षण करायचा, पण आज बहीणही भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. रक्षण म्हणजे फक्त शारीरिक रक्षण नाही, तर भावनिक आधार, सुख-दुःखात साथ देणे, एकमेकांचा सन्मान करणे हे सुद्धा रक्षणच आहे.

हा सण आपल्याला शिकवतो की, नातं हे रक्तापेक्षा मोठं असतं. ज्या नात्यात विश्वास, प्रेम आणि आदर असतो तेच नातं खरं.

**आजच्या युगातील रक्षाबंधनाचे स्वरूप**

आज जागतिकीकरणाच्या युगात भाऊ-बहीण अनेकदा नोकरीनिमित्त लांब असतात. प्रत्यक्ष भेट शक्य नसेल तरी व्हिडिओ कॉलद्वारे, कुरिअरने राखी पाठवून हा सण साजरा केला जातो. बाजारात सोन्यापासून ते इको-फ्रेंडली अशा विविध प्रकारच्या राख्या उपलब्ध आहेत. पण राखीची किंमत महत्वाची नाही, तर त्या मागची भावना महत्वाची आहे.

काही ठिकाणी तर आता 'वृक्षाला राखी', 'देशाच्या जवानाला राखी', 'निसर्गाला राखी' असे उपक्रमही राबवले जातात. यातून रक्षाबंधनाची व्याप्ती आणखी वाढली आहे. आपण आपल्या पर्यावरणाचे, देशाचे रक्षण करण्याचे वचनही या दिवशी घेतो.

**रक्षाबंधनातून मिळणारा संदेश**

रक्षाबंधन हा फक्त सण नाही, तर तो एक संस्कार आहे. तो आपल्याला शिकवतो - नातं जपा, प्रेम वाढवा, एकमेकांचा आदर करा. बहिणीच्या हातचा तो छोटासा धागा भावाच्या मनगटावर आयुष्यभराची जबाबदारी देतो. आणि बहिणीसाठी तो धागा म्हणजे आयुष्यभराचा विश्वास असतो की, कोणी असो वा नसो, माझा भाऊ माझ्या पाठीशी आहे.

आज समाजात महिलांवरील अत्याचार वाढत असताना, रक्षाबंधनाचा खरा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक पुरुषाने केवळ आपल्या बहिणीचेच नाही, तर समाजातील प्रत्येक स्त्रीचा सन्मान आणि रक्षण करण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे, तरच या सणाला खरा अर्थ प्राप्त होईल.

शेवटी रक्षाबंधन म्हणजे एका धाग्यात गुंफलेले अतूट प्रेम, विश्वास आणि जन्मभराच्या साथीचे वचन.



**शेषराव नर्मदा गोपाळ कडू**
**वरुड, मो नं. ९९२३९८८७३४**

# युवकांमधील मानसिक आरोग्य : मौन तोडण्याची वेळ

आजचा युवक पूर्वीपेक्षा अधिक शिक्षित, अधिक तंत्रज्ञानस्नेही आणि अधिक संधींनी वेढलेला आहे. त्याच्या हातात स्मार्टफोन आहे, जगभरातील माहिती काही सेकंदांत उपलब्ध आहे, करिअरचे अनेक पर्याय खुले आहेत आणि स्वप्नेही मोठी आहेत. परंतु या चमकदार चित्रामागे एक कटू वास्तव लपलेले आहेड्ढयुवकांमधील मानसिक आरोग्याचा वाढता प्रश्न. ताण, नैराश्य, चिंता, एकाकीपणा, अपयशाची भीती, सामाजिक तुलना आणि भविष्याबद्दलची असुरक्षितता या समस्यांनी आजची तरुण पिढी वेढली आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे या विषयावर अजूनही उघडपणे बोलण्यास अनेक युवक संकोच करतात. म्हणूनच आता मौन तोडण्याची वेळ आली आहे.




**बदलत्या काळातील वाढता मानसिक ताण**

आजचा युवक स्पर्धेच्या अशा युगात जगत आहे, जिथे प्रत्येक क्षेत्रात सर्वोत्तम होण्याची अपेक्षा आहे. दहावी, बारावी, स्पर्धा परीक्षा, नोकरी, करिअर, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा यासाठी सतत धावपळ सुरू असते. एका विद्यार्थ्याला चांगले गुण मिळवण्याचा दबाव असतो, तर दुसऱ्याला चांगली नोकरी मिळवण्याची चिंता असते. सोशल मीडियावर इतरांचे यश, आनंदी जीवन आणि चैनीची जीवनशैली पाहून स्वतःची तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. परिणामी अनेक युवक स्वतःला अपुरे समजू लागतात.

मानसिक ताण हा जीवनाचा नैसर्गिक भाग असला तरी तो सतत वाढत राहिला, तर तो नैराश्य किंवा चिंतेच्या गंभीर समस्येत रूपांतरित होऊ शकतो. दुर्दैवाने अनेक युवक हे संकेत ओळखत नाहीत किंवा ओळखूनही त्याकडे दुर्लक्ष करतात.

**सोशल मीडिया : जोडणारे साधन की एकाकीपणाचे कारण?**

सोशल मीडियाने संवादाची व्याख्या बदलली आहे. मित्रांशी संपर्क, शिक्षण, माहिती आणि मनोरंजन यासाठी तो उपयुक्त आहे. परंतु त्याचा अतिरेक मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू लागला आहे.

आज अनेक युवक दिवसाचे अनेक तास मोबाईल स्क्रीनसमोर घालवतात. इन्स्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅट किंवा इतर प्लॅटफॉर्मवर दिसणारे 'परफेक्ट' आयुष्य अनेकदा वास्तव नसते. तरीही त्याची तुलना स्वतःच्या आयुष्याशी केली जाते. लाइक्स, फॉलोअर्स आणि कमेंट्सवर आत्मविश्वास अवलंबून राहू लागतो. ऑनलाइन ट्रोलिंग, सायबर बुलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रिया मानसिक जखमा निर्माण करतात.

वास्तविक मैत्री कमी होत जाते आणि आभासी संबंध वाढतात. गर्दीत असूनही एकटेपणाची भावना निर्माण होते. हा आधुनिक काळातील सर्वात मोठा विरोधाभास आहे.

**विद्यार्थ्यांवरील अपेक्षांचे ओझे**

भारतीय समाजात शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे. हे योग्य असले तरी अनेकदा गुण आणि यशालाच विद्यार्थ्याच्या किमतीचे मोजमाप मानले जाते. 'पहिला नंबर मिळव', 'इतरांपेक्षा पुढे जा', 'मोठी नोकरी मिळव' अशा अपेक्षा काही वेळा विद्यार्थ्यांच्या मनावर प्रचंड दबाव निर्माण करतात.

बारावी किंवा स्पर्धा परीक्षांच्या काळात अनेक विद्यार्थी झोप कमी घेतात, स्वतःला सतत दोष देतात आणि अपयशाची भीती बाळगतात. काही विद्यार्थ्यांना अभ्यासात लक्ष लागत नाही, भूक कमी होते, चिडचिड वाढते किंवा कोणाशीही बोलावेसे वाटत नाही. ही लक्षणे मानसिक तणावाची असू शकतात.

महत्त्वाचे म्हणजे अपयश हा शेवट नसतो. परंतु समाजातील काही चुकीच्या समजुतींमुळे युवकांना तसे वाटू लागते.

**बेरोजगारी आणि भविष्याची चिंता**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी मिळण्याचा संघर्षही युवकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतो. मुलाखती, स्पर्धा परीक्षा, आर्थिक अस्थिरता आणि कुटुंबाच्या अपेक्षा यामुळे अनेक युवक सतत चिंतेत राहतात.

ग्रामीण भागातील युवकांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण असते. मर्यादित रोजगाराच्या संधी, आर्थिक अडचणी आणि स्थलांतराची वेळ यामुळे मानसिक ताण वाढतो. अनेकदा या समस्यांवर बोलण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध नसते.

**मानसिक आरोग्याबाबतचे गैरसमज**

आपल्या समाजात अजूनही मानसिक आरोग्याबाबत अनेक गैरसमज आहेत.

'हे फक्त मनाचे खेळ आहेत.' 'मजबूत माणसाला नैराश्य येत नाही.' 'लोक काय म्हणतील?' 'डॉक्टरांकडे जाणे म्हणजे वेडेपणा.'

हे गैरसमज सर्वात धोकादायक आहेत. ज्या प्रकारे ताप आला तर डॉक्टरांकडे जातो, त्याच प्रकारे मानसिक त्रासासाठी मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकाची मदत घेणे पूर्णपणे सामान्य आहे.

**मौनामुळे समस्या वाढते; संवादामुळे उपाय सापडतो.**

**कुटुंबाची भूमिका**

युवकांच्या मानसिक आरोग्याच्या जपणुकीत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पालकांनी मुलांशी केवळ अभ्यासाबद्दल नव्हे, तर त्यांच्या भावना, भीती आणि अनुभवांबद्दलही संवाद साधला पाहिजे.

काही वेळा मुलांना उपाय नको असतो; त्यांना फक्त कोणीतरी ऐकून घेणारा माणूस हवा असतो. टीका करण्याऐवजी समजून घेणे, तुलना करण्याऐवजी प्रोत्साहन देणे आणि अपयश स्वीकारण्याची मानसिकता निर्माण करणे आवश्यक आहे.

घरातील सकारात्मक वातावरण युवकांना मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम बनवते.

**शाळा आणि महाविद्यालयांची जबाबदारी**

शैक्षणिक संस्था केवळ ज्ञान देणारी केंद्रे नसून व्यक्तिमत्त्व घडवणारी ठिकाणे आहेत. त्यामुळे प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात समुपदेशन सेवा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**नियमित मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम**

समुपदेशकांची नियुक्ती
तणाव व्यवस्थापन कार्यशाळा
परीक्षा काळातील विशेष मार्गदर्शन

विद्यार्थ्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित वातावरण

अशा उपक्रमांमुळे अनेक समस्या सुरुवातीलाच ओळखता येऊ शकतात.

**मित्रांची साथ सर्वात प्रभावी**

युवक अनेकदा आपल्या मित्रांशी अधिक मोकळेपणाने बोलतात. त्यामुळे मित्रांची भूमिका महत्त्वाची ठरते.

जर एखादा मित्र अचानक शांत झाला असेल, सतत उदास दिसत असेल, लोकांपासून दूर राहत असेल किंवा स्वतःबद्दल नकारात्मक बोलत असेल, तर त्याच्याकडे दुर्लक्ष करू नये. त्याच्याशी प्रेमाने संवाद साधावा आणि आवश्यक असल्यास मोठ्यांची किंवा तज्ज्ञांची मदत घेण्यास प्रोत्साहित करावे.

**एक संवेदनशील मित्र अनेकदा मोठा आधार ठरू शकतो.**

सरकार आणि समाजाची भूमिका

मानसिक आरोग्याला सार्वजनिक आरोग्याचा महत्त्वाचा भाग मानण्याची गरज आहे. ग्रामीण भागात मानसोपचार सेवा उपलब्ध करून देणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मानसिक आरोग्य सेवा मजबूत करणे आणि जनजागृती मोहिमा राबवणे आवश्यक आहे.

प्रसारमाध्यमांनीही मानसिक आरोग्याबाबत जबाबदारीने वृत्तांकन करावे. सनसनाटीपणा टाळून योग्य माहिती आणि मदतीचे मार्ग नागरिकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत.

मानसिक आरोग्य जपण्यासाठी काही सकारात्मक सवयी मानसिक आरोग्य मजबूत ठेवण्यासाठी काही साध्या सवयी उपयुक्त ठरू शकतात.

पुरेशी झोप घेणे.
नियमित व्यायाम करणे.
संतुलित आहार घेणे.
मोबाईल आणि सोशल मीडियाचा मर्यादित वापर करणे.
मित्र आणि कुटुंबीयांशी संवाद ठेवणे.
छंद जोपासणे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# लासलगाव रेल्वे स्थानकात 'कांदा एक्सप्रेस' रोखली : प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आंदोलन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***लासलगाव*** – केंद्र सरकारच्या ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार दिल्लीतील कांद्याचे वाढते बाजारभाव नियंत्रणात आणण्यासाठी लासलगाव येथून दिल्लीला पाठवण्यात येणारी 'कांदा एक्सप्रेस' बुधवारी प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रोखून धरली.

त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, रेल्वे सुरक्षा दल आणि पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. तब्बल ४२ तासांच्या विलंबानंतर बुधवारी दुपारी ३.१० वाजता दिल्लीच्या दिशेने रवाना झाली. ८४० मेट्रिक



टन कांदा पाठवण्याचे नियोजन असताना प्रतवारी व ४० किलोच्या गोण्यांचे पॅकिंग वेळेत पूर्ण न झाल्याने प्रत्यक्षात केवळ ५०० मेट्रिक टन कांदा रेल्वेने रवाना झाला. ३४० मेट्रिक टन कांदा कमी पाठवला गेल्याने एनसीसीएफ व सेंट्रल वखार महामंडळाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिल्ली येथे शासकीय कांदा पाठवण्यासाठी लासलगाव रेल्वे स्थानकात सोमवारी रात्री २१ बोगींची मालगाडी दाखल झाली होती. सेंट्रल वखार महामंडळाच्या नियोजनानुसार ही कांदा एक्सप्रेस मंगळवारी सकाळी सात वाजता दिल्लीसाठी रवाना होणे अपेक्षित होते.

# २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची होणार तपासणी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्रिपक्षीय करार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – राज्यातील शासकीय शाळांमधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या सुमारे २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत



अलीकडेच शालेय शिक्षण विभाग, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यात आला.

या करारानुसार राज्यातील शासकीय शाळांमधील पाचवी ते दहावीच्या २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्याची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल. रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून कार्य करणार असून वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहील. दृष्टीदोष असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही ही संस्था घेणार आहे. या कराराचा कालावधी ३६ महिन्यांचा राहणार आहे. या कालावधीत राज्यभरात डोळे तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येईल.

# सौंदर्य प्रसाधने घेताना जरा जपूनच!

## जळगावात विनापरवाना सौंदर्य प्रसाधनांवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***जळगाव*** – जिल्ह्यात विनापरवाना सौंदर्य प्रसाधनांची निर्मिती आणि विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने अमळनेर आणि जळगाव शहरात कारवाई केलीय.

या कारवाईत दोन ठिकाणांहून तब्बल १ लाख ६ हजार ३२५ रुपये किमतीचा सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला आहे. सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त अमळनेरच्या रवींद्रनगर परिसरात प्रियदर्शनी रजाळे यांच्या मालकीच्या ठिकाणी पंचांसमक्ष तपासणी करण्यात आली. यावेळी विविध प्रकारची सौंदर्य प्रसाधने आढळून आली. त्यांची एकूण किंमत ७२ हजार




३९२ रुपये असून हा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. यानंतर जळगाव शहरातील महाबळ परिसरात राशी तळरेजा यांच्या मालकीच्या ठिकाणी तपासणी करण्यात आली. येथे सौंदर्य प्रसाधनांसोबतच त्यांचे पॅकिंग आणि उत्पादनासाठी वापरले जाणारे साहित्यही आढळले. या ठिकाणाहून ३३ हजार ९३३ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासणीदरम्यान क्रीम, पावडर आणि जेल स्वरूपातील विविध उत्पादने आढळली. काही उत्पादनांवर लेबल होते, तर काही उत्पादने विनालेबल असल्याचे समोर आले. याशिवाय प्रिंटेड लेबल्स, रिकाम्या बरण्या, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि इतर पॅकिंग साहित्यही जप्त करण्यात आले. संबंधित ठिकाणी वैध उत्पादन परवाना नसतानाही सौंदर्य प्रसाधनांचा साठा, उत्पादन आणि पॅकिंग केले जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

# माणदेशातील तरस संवर्धनाला जागतिक बळ : तरसांची गणना करणारे किरकसाल ठरले पहिले गाव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***कराड*** – कायम दुष्काळ, उन्हाळा आणि प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती यांच्याशी झुंजणाऱ्या माणदेशाच्या मातीत जैवविविधतेचा अनमोल ठेवा दडलाय. याच जैवविविधतेतील अन्न साखळीचा महत्त्वाचा दुवा आणि निसर्गाचा महत्वाचा 'स्वच्छतादूत' असलेल्या तरसाच्या संवर्धनासाठी माण तालुक्यातील 'किरकसाल' गाव परिसरात सुरू असलेल्या प्रयत्नांना आता जागतिक व्यासपीठ मिळाले आहे. विशेष म्हणजे, तरसाची शास्त्रीय पद्धतीने गणना करणारे महाराष्ट्रातील पहिले गाव म्हणून 'किरकसाल' गावाने वेगळी ओळख निर्माण केली आहे. तरस हा केवळ शिकारी प्राणी



नसून निसर्गाचा 'स्वच्छतादूत' म्हणूनही त्याची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे एखाद्या परिसरात तरसाचे अस्तित्व असणे ही तेथील नैसर्गिक परिसंस्था सक्षम असल्याची खूण मानली जाते. माणदेशातून थेट आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर किरकसाल परिसरातील या संवर्धन कार्याची दखल घेत युवा वन्यजीव संशोधक चिन्मय सावंत यांची 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर'च्या (आययुसीएन) तरस विशेष गटासाठी सदस्य म्हणून निवड झाली आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवलेल्या २ हजाराहून राख्यांची विक्री

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – रक्षाबंधनाच्या निमित्ताने आपल्या कल्पकतेने आणि स्वहस्ते साकारलेल्या राख्या घेऊन मुंबईकरांसमोर आलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या विशेष शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मुंबईकरांनी मनापासून दाद दिली. महानगरपालिका मुख्यालयासह विविध प्रशासकीय विभाग कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या राखी प्रदर्शनात या विद्यार्थ्यांनी तब्बल २ हजार ५२ राख्यांची विक्री केली. या विक्रीतून तसेच इतर वस्तूंच्या विक्रीतून ५१ हजार १९० इतकी रक्कम जमा झाली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केलेल्या विक्रीतून जमा झालेली ही रक्कम त्याच



विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली, त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा या उपक्रमाचे खरे यश ठरले. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा मीनल तुर्डे यांच्या संकल्पनेतून आणि नियोजन विभागाच्या माध्यमातून रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर हे विशेष राखी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच महानगरपालिकेच्या विशेष शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

# राजकुमार चुके यांचे निधन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***हिवरखेड*** – वडगाव माहोरे येथील माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच सेवा सहकारी सोसायटीचे माजी संचालक राजकुमार देवराव चुके (८६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते हिवरखेड येथील सरपंच सविता मालपे यांचे वडील होत. मुळचे वडगाव माहोरे येथील रहिवासी असलेले राजकुमार चुके हे काही दिवसांपासून मुलीकडे हिवरखेड येथे वास्तव्यास होते. ते गावातील सामाजिक व सहकार क्षेत्रातील कार्यामुळे परिचित होते.

त्यांच्या पार्थिवावर



हिवरखेड येथील निर्मिक स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगी, जावई, नातू, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे वडगाव माहोरे व हिवरखेड परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# भाजप प्रवेशासाठी निघालेले उबाठा गटाचे नगरसेवक रातोरात शिंदेंच्या शिवसेनेत दाखल

## भाजप-शिवसेनेत राजकीय नाट्य : खासदार ओमराजेंकडून राणा पाटलांना धोबीपछाड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – धाराशिव शहरात नगरसेवकांच्या फोडाफोडीच्या राजकारणावरून सत्ताधारी महायुतीमधील भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जोरदार राजकीय संघर्ष पाहायला मिळाला आहे. भाजप प्रवेशासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या उबाठा गटाच्या नगरसेवकांनी वाटेतच 'यू-टर्न' घेत बुधवारी रात्री उशिरा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अत्यंत गोपनीयरीत्या आखलेल्या



रणनीतीमुळे राणा पाटील यांना शह मिळाल्याची चर्चा आहे. धाराशिवमध्ये भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचे पुत्र मल्हार पाटील यांच्या माध्यमातून उबाठा गटाच्या नगरसेवकांना पक्षात घेण्यासाठी 'ऑपरेशन लोटस २.०' राबविण्यात येत होते. या मोहिमेअंतर्गत उबाठा गटाचे नगरसेवक भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश करण्यासाठी मुंबईकडे रवाना झाले होते. मात्र, हे नगरसेवक पुण्याच्या इंदापूरजवळ पोहोचताच राजकीय घडामोडींना वेग आला आणि या नगरसेवकांनी अचानक माघार घेत धाराशिव गाठले. या संपूर्ण घटनेमागे शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांची रणनीती काम करत होती. धाराशिवमध्ये परतल्यानंतर ओमराजेंच्या माध्यमातून या सर्व नगरसेवकांना तातडीने ठाण्यात हलवण्यात आले आणि रात्री उशिरा उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश झाला. यापूर्वी कळंब नगर परिषदेतील नगरसेवकांना आपल्याकडे खेचत भाजपने 'ऑपरेशन लोटस' यशस्वी केले होते, मात्र आता ओमराजेंनी 'ऑपरेशन टायगर' राबवत राणा पाटील यांना शह दिला आहे. मात्र, या राजकीय उलथापालथीमुळे स्थानिक पातळीवर मित्रपक्ष असलेले भाजप आणि शिवसेना आमनेसामने आल्याचे चित्र असून, उर्वरित नगरसेवक नेमकी कोणती भूमिका घेतात याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# ओबीसी 'क्रिमीलेयर' निकषाबाबत १ सप्टेंबरला सुनावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – नागरी सेवा परीक्षा २०२५ मधील उमेदवारांसाठी इतर मागासवर्गीय 'क्रीमी लेयर' निकषांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकारने दाखल केलेल्या स्पष्टीकरण याचिकेवर सर्वोच्च न्यायालय १ सप्टेंबर रोजी सुनावणी करणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळानुसार, न्या.पी.एस. नरसिंहा आणि न्या.आर.महादेवन यांचे विशेष खंडपीठ १ सप्टेंबर रोजी दुपारी ३:३० वाजता या प्रकरणावर



सुनावणी घेणार आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जोयमाल्या बागची आणि न्या.व्ही.मोहना यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारच्या या मागणीची दखल घेत विशेष खंडपीठ स्थापन करण्यास सहमती दर्शवली होती. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, कार्मिक व प्रशिक्षण विभागाने एका निकाला लागलेल्या प्रकरणात तातडीच्या निर्देशांसाठी अर्ज दाखल केला असून त्यावर न्या. नरसिंहा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सुनावणी करणे आवश्यक आहे.

## राजुरा बाजार ते मुसळखेडा पायदळ वारी उत्साहात

# संत यशवंत महाराजांच्या जयघोषाने राजुरा नगरी दुमदुमली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – श्रावण मासानिमित्त श्री यशवंत महाराज व सतीमाता मंदिर देवस्थान, राजुरा बाजार येथून श्री क्षेत्र मुसळखेडापर्यंत भव्य पायदळ वारीचे (दिंडी शोभायात्रा) अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' आणि संत यशवंत महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण राजुरा नगरी दुमदुमून गेली होती.

या शोभायात्रेत वरूड तालुक्यासह राजुरा बाजार पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग







घेतला. सकाळी ८ वाजता राजुरा बाजार येथून निघालेली ही दिंडी मुसळखेडा येथे पोहोचली.

**भक्तांचा महासागर व भजनाचा गजर**

गेल्या १५ ते २५ वर्षांपासून चालत आलेल्या या परंपरेत दरवर्षी भाविकांची संख्या सातत्याने वाढत असून, यावर्षी २५ ते ३० हजारांहून अधिक भक्तांचा मोठा जनसागर पाहायला मिळाला. पालखी, रथ, हातामध्ये दिंड्या व पताका घेऊन भाविक भक्तीरसात तल्लीन झाले होते. लहान मुलांनी श्रीकृष्णाच्या विविध रुपांमध्ये केलेली वेशभुषा या शोभायात्रेचे विशेष आकर्षण ठरले.

**सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

याप्रसंगी विविध राजकीय पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्ते निलेश साबळे यांनी सांगितले की, राजुरा बाजार व परिसरातील ग्रामीण भागातून नागरिक अत्यंत धार्मिक वृत्तीने या परंपरेत मोठ्या संख्येने सहभागी होतात. मुसळखेडा येथे दिंडीचे आगमन झाल्यानंतर भाविकांसाठी हरिनाम किर्तन आणि महाप्रसादाचे विशेष आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. यासंदर्भात ग्रामविकास विभागाने अध्यादेश जारी केला असून, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील तरतुदींनुसार नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांची पात्रता व नियुक्ती याबाबतचे नियम निश्चित केले आहेत.

या नियमांनुसार पंचायत समितीमध्ये नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या सदस्यांची संख्या संबंधित पंचायत समितीच्या एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या २० टक्के किंवा किमान एक, यापैकी जी संख्या अधिक असेल, इतकी निश्चित करण्यात येणार आहे. तर जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या १० टक्के किंवा किमान पाच, यापैकी जी संख्या अधिक असेल, तितके नामनिर्देशित सदस्य असतील.

नामनिर्देशनासाठी संबंधित क्षेत्राचा रहिवासी असणे तसेच पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद प्रशासनासंबंधी विशेष ज्ञान अथवा कार्यानुभव असणे आवश्यक राहील. याशिवाय वैद्यकीय, शिक्षण, कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामीण विकास, महिला व बाल विकास, कला, साहित्य, समाजकार्य, अभियांत्रिकी आणि विधी क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना पात्रतेत स्थान देण्यात आले आहे. दीर्घकाळ शासनसेवा केलेले सेवानिवृत्त अधिकारी तसेच सामाजिक कल्याण क्षेत्रात कार्यरत अनुभवी अशासकीय संस्थांचे पदाधिकारी यांचाही नामनिर्देशनासाठी विचार करता येणार आहे. नामनिर्देशन प्रक्रियेत संबंधित जिल्ह्यातील मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष, गट, आघाडी अथवा फ्रंट यांच्या तौलनिक संख्याबळाचा विचार करण्यात येणार आहे. जागांचे वाटप पूर्णांक आणि पात्र अपूर्णांकाच्या आधारे केले जाईल. समान अपूर्णांक असल्यास सोडतीद्वारे जागा निश्चित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी संबंधित पक्ष, गट, आघाडी अथवा फ्रंट यांच्याशी सल्लामसलत करून पात्र व्यक्तींच्या नावांची शिफारस करतील. संबंधित जिल्हा परिषद या शिफारशींचा विचार करून नामनिर्देशन करेल. शिफारस नाकारण्यात आल्यास त्यामागील कारणे लेखी स्वरूपात नोंदविणे आवश्यक राहील. तसेच विविध पात्रता क्षेत्रातील व्यक्तींना प्रतिनिधित्व मिळावे, यासाठीही प्रयत्न करण्याची तरतूद नियमांमध्ये करण्यात आली आहे.

नामनिर्देशित सदस्यांची नावे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील. त्यानंतर जिल्हाधिकारी संबंधित सदस्यांना प्रमाणपत्र प्रदान करतील. नामनिर्देशित सदस्याचे पद रिक्त झाल्यास ती जागा भरण्यासाठीही याच नियमांची अंमलबजावणी करण्यात येईल.

# साखरेचे दर चढेच : देशात सरासरी दर ६५ रुपये किलो

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – सरकार आणि साखर उद्योगाने साखरेच्या दरात घट होणार असल्याचे सांगूनही सणासुदीच्या मागणीत वाढ झाल्यामुळे किरकोळ बाजारात साखरेचे भाव सलग दुसऱ्या दिवशी बुधवारी १ रुपये किलो वाढून ते ६५ रुपये झाले, असे सरकारी आकडेवारीवरून समोर आले आहे.

सरकारने १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयातीस परवानगी दिल्यानंतर कारखान्यांतून मिळणाऱ्या दरात सुमारे २० टक्क्यांनी घसरण झाली असूनही गोड पदार्थांचे किरकोळ दर उच्च पातळीवरच आहेत.

ग्राहक व्यवहार विभागाच्या आकडेवारीनुसार, २६ ऑगस्ट रोजी साखरेचा सर्व-भारतीय सरासरी दर रु. ६५.०५ प्रति किलो आहे, जो मंगळवारी रु. ६३.९७ प्रति किलो होता.

साखरेची सध्याची सरासरी किंमत एका महिन्यापू-र्वीच्या रु. ४८.६८ प्रति किलोपेक्षा ३४ टक्क्यांनी जास्त आहे, तर वर्षापूर्वीच्या पातळीपेक्षा (जेव्हा साखर रु. ४६.२७ प्रति किलो उपलब्ध होती) दर ४१ टक्क्यांनी अधिक आहेत. आकडेवारीनुसार बुधवारी साखरेचा कमाल विक्री दर रु. ७६ प्रति किलो, तर सरासरी विक्री दर रु. ६५ प्रति किलो होता. सरकार आणि साखर उद्योग संस्थांनी सांगितले आहे की गेल्या काही दिवसांत कारखान्यांचे दर घसरले आहेत. मात्र, त्याचा परिणाम अजून किरकोळ पातळीवर दिसणे बाकी आहे. बुधवारी साखरेचा घाऊक दरही वाढून रु. ६०.३६ प्रति किलो झाला. एका महिन्यापूर्वी सरासरी घाऊक दर रु. ४५.३४ प्रति किलो आणि एका वर्षापूर्वी रु. ४३.०२ प्रति किलो होता.

# नारळी पौर्णिमेला रंगते नारळ फोडीची रंगत : कोकणच्या मातीत जपली जाते परंपरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**रायगड**– कोकण आणि समुद्राचे नाते अतूट आहे. अथांग समुद्र, नारळी-पोफळीच्या बागा, माडांच्या सावल्या आणि समुद्राशी जोडलेले मच्छीमारांचे जीवन ही कोकणच्या लोकसंस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. समुद्राशी असलेले हे नाते अधिक दृढ करणारा सण म्हणजे नारळी पौर्णिमा. श्रावण पौर्णिमेला साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात समुद्राला नारळ अर्पण करून सुख-समृद्धी, सुरक्षितता आणि भरभराटीची प्रार्थना केली जाते. याच दिवशी कोकणातील अनेक गावांमध्ये पारंपरिक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यात नारळ फोडीची स्पर्धा हे विशेष आकर्षण ठरते. मच्छीमार समाजासाठी नारळी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने मासेमारीचा हंगाम काही काळ थांबलेला असतो. नारळी पौर्णिमेनंतर समुद्राची पूजा करून नव्या मासेमारी हंगामाला सुरुवात करण्याची परंपरा आहे.

# आधी म्हणाले सुप्रिया सुळेंकडे ओबीसी सर्टिफिकेट, आता म्हणाले चुकून बोललो

## वडेट्टीवारांकडून जाहीर खेद व्यक्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई**– अनेक मराठा नेत्यांकडे ओबीसी सर्टिफिकेट आहे, सुप्रिया सुळेंकडेही ओबीसी सर्टिफिकेट आहे, असं वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी आता त्यांचे शब्द मागे घेतले आहेत. सुप्रिया सुळे यांचा उल्लेख आपल्याकडून अनावधानाने झाला असल्याचं वडेट्टीवार म्हणाले. त्यावर त्यांनी खेदही व्यक्त केला आहे. असं असलं तरी ओबीसी सर्टिफिकेट घेऊन सत्तेचा लाभ घेणाऱ्या मराठा नेत्यांबाबत आपली भूमिका बदलली नाही, असंही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

भाजपचे नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह अनेक मराठा नेत्यांकडे ओबीसी सर्टिफिकेट आहे, त्याचसोबत सुप्रिया सुळे यांनीही ओबीसी सर्टिफिकेट काढून ठेवलं आहे, असा दावा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. तसेच शरद पवार यांच्याकडे ओबीसी सर्टिफिकेट आहे की नाही याची माहिती नाही, असंही ते म्हणाले होते. विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडे नाराजी व्यक्त केली. पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी वडेट्टीवारांनी माफी मागावी अशी मागणी केली. वडेट्टीवारांनी जाहीर माफी मागावी, सुप्रिया सुळेंची मागणी वडेट्टीवार यांनी केलेल्या दाव्यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, वडेट्टीवारांचं वक्तव्य ऐकून मला धक्का बसला, माझ्याकडे ओबीसीचं कोणतंही प्रमाणपत्र नाही. वडेट्टीवारांनी माझ्याकडे कुणबी प्रमाणपत्र असल्याचा पुरावा द्यावा, अन्यथा जाहीर माफी मागावी.

# पती-पत्नीने दोन मुलांसह रेल्वेखाली जीवन संपवले : जळगावमधील धक्कादायक घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**अमळनेर** – जळगाव जिल्ह्यामधील अमळनेर तालुक्यातील टाकरखेडा येथील पती आणि पत्नीने आपल्या दोन मुलांसह रेल्वेखाली स्वतःला झोकून आत्महत्या केल्याची घटना घडली. सदर घटना २७ ऑगस्ट रोजी पहाटे ४ ते ४.३० च्या दरम्यान घडल्याची माहिती समोर आली आहे.

अमळनेर तालुक्यातील टाकरखेडा येथील सुनील अमृत भिल, त्याची पत्नी पार्वती सुनील भिल यांनी आपल्यासोबत दुसरीला असलेला मुलगा सनी व अंगणवाडीत असलेला राज यांनासोबत घेऊन पहाटे चार वाजेच्या सुमारास घरातून गेल्याचे समजते. यानंतर सगळ्यांनी धावत्या रेल्वेत झोकून दिल्याने त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे होऊन जागीच मृत्यू झाला आहे. सदर घटनेबाबत पहाटे ४.४० वाजता रेल्वे अधिकाऱ्यांनी पोलिसांना कळवले आहे. एकाच कुटुंबातील चौघे जण मृत झाल्याने संपूर्ण गाव हळहळ व्यक्त करत आहे. आत्महत्येचे कौटुंबिक वादातून आत्महत्या केल्याची चर्चा सुरू आहे.

अमळनेरमधील आणखी एक धक्कादायक घटना- अमळनेरमधील खवशी येथील गावतळ्याकाठी राहणारे आण्णा एकनाथ तलवारे वय ३२ यांचा मुलगा वीरेंद्र हा अचानक तळ्याच्या पाण्यात बुडाला. वीरेंद्र गाळात फसल्याने त्याला बाहेर पडता येत नसल्याने त्याला वाचवण्यासाठी त्याच्या वडिलांनी पाण्यात उडी मारली. मात्र ते ही गाळात फसले आणि थोड्या वेळात त्यांचाही मृत्यू झाला. गावकऱ्यांच्या मदतीने दोघांचे शव पाण्याबाहेर काढून विच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात नेले. प्रवाहित विजेचा धक्का लागून महिलेचा मृत्यू, भंडाऱ्यातील घटना- भंडाऱ्याच्या आसगाव येथील हादरवणारी घटना समोर आली आहे.

# रक्षाबंधनानिमित्त बेस्टच्या १३६ अतिरिक्त बसेस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – रक्षाबंधन सणानिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, बेस्ट उपक्रमाने मुंबई शहर व उपनगरात अतिरिक्त बससेवा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी प्रवाशांच्या सोयीसाठी एकूण १३६ अतिरिक्त बसगाड्या विविध मार्गांवर सोडण्यात येणार आहेत. बेस्ट प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या अतिरिक्त बसगाड्यांचे संचालन सकाळी १०.३० वाजल्यापासून दिवसभर करण्यात येईल. प्रवाशांची गर्दी अपेक्षेपेक्षा अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार आणखी अतिरिक्त बसगाड्या उपलब्ध करून देण्याची तयारीही उपक्रमाने ठेवली आहे. प्रवाशांना सुलभ आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी काही महत्त्वाच्या बसस्थानकांवर आणि मार्गांवर बसनिरीक्षक, वाहतूक अधिकारी तसेच सुरक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यामुळे बससेवेचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार असून प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्यास मदत होईल.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'अक्षय ऊर्जा दिन' उत्साहात साजरा

## अक्षय ऊर्जा संदेशासाठी विविध स्पर्धा, जनजागृती रॅली व ऊर्जा संवर्धनाची शपथ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**अमरावती** – विद्यार्थ्यांमध्ये अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक ऊर्जास्रोत, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत विकासाबाबत जागृती निर्माणकरण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (इएसए) आणि विद्युत अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहपूर्ण वातावरणात 'अक्षय ऊर्जा दिन' साजरा झाला.

विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, लघुचित्रफीत निर्मिती स्पर्धा आणि पोस्टर निर्मिती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अक्षय ऊर्जा, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवर आपले ज्ञान, कल्पकता व सर्जनशीलता सादर केली. अक्षय ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रवीण कुमार वानखेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाढती ऊर्जेची गरज, पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील वाढता ताण, अक्षय ऊर्जेची भविष्यातील भूमिका तसेच या क्षेत्रातील रोजगार, संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकतेच्या विविध संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एम.महल्ले, विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभागप्रमुख डॉ.एम.व्ही.जपे, प्राध्यापक समन्वयक डॉ.पी.पी. बेडेकर आदी यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या सहभागातून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेट देत अक्षय ऊर्जेचा अधिकाधिक वापर, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा संवर्धनाची शपथ घेतली तसेच विविध विभागांमध्ये जनजागृतीपर पोस्टर्स लावून ऊर्जा बचतीचा आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापराचा संदेश दिला.

# महिला आर्थिक सक्षमीकरणास प्राधान्य

## 'उमेद'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रभावी प्रयत्न राज्य शासन विविध माध्यमातून करत आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात 'उमेद'च्या माध्यमातून सक्षमीकरणाचे हे काम ग्रामीण भागात यशस्वीपणे व्यापक स्वरूपात सुरू आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, कृषी निविष्ठांची उपलब्धता आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना शाश्वत उत्पन्नाचे साधन मिळत असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांना महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी न करता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे.

४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या आहेत. महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे या सुविधा केवळ यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या केंद्रांपुरत्या मर्यादित न राहता समुदायाच्या मालकीच्या आणि व्यवस्थापनाखालील कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.शेतीचा खर्च कमी : उत्पादकतेला हातभार महागडी कृषी यंत्रे खरेदी करण्याची गरज नसल्याने महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने वेळेत पूर्ण होत असल्याने शेतीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून समुदाय आधारित संस्थांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांच्या व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत. त्यामुळे एका उपक्रमातून महिला शेतकरी, बचत गट आणि स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्था अशा अनेक घटकांना लाभ मिळत आहे.




# नागपुरातील अप्पर आदिवासी आयुक्त कार्यालयात विद्यार्थ्यांचा ठिय्या




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – आमचं शैक्षणिक नुकसान होत आहे, विविध स्पर्धा परीक्षांची तयारी थांबली आहे, आंदोलन लांबल्यामुळे घरातून विचारणा होऊ लागली आहे, अशी प्रतिक्रिया देत नागपुरातील अप्पर आदिवासी आयुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलनावर बसलेल्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांनी आमच्या आंदोलनाकडे लक्ष घालावे, अन्यथा आमच्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी त्यांनी घ्यावी, अशी मागणी केली आहे.

नागपुरात आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन १३ ऑगस्टपासून सुरू होते. २२ ऑगस्ट रोजी आदिवासी विकास मंत्र्यांशी चर्चा झाल्यानंतर तेव्हा आंदोलनाचं नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील कमाल वयोमर्यादा शिथिल करण्याचा आश्वासन शासनाकडून मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेतलं होतं. मात्र दोनच दिवसात विद्यार्थ्यांमध्ये मतभेद होऊन बहुतांशी विद्यार्थ्यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले.

# तीन अधिकाऱ्यांसह सहा जण अटकेत

## अप्पर सचिव अभिजीत लेंडवे, क्लासचालकही ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – अन्न,औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट–ब पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेली संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर मुंबई गुन्हे शाखेने बुधवारी याप्रकरणात मोठी कारवाई केली आहे. मुंबई गुन्हे शाखेने एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक केली आहे. औषध निरीक्षक पेपरफुटीप्रकरणात एमपीएससीचे अप्पर सचिव अभिजीत लेंडवे यांना अटक करण्यात आली आहे. पेपर फुटल्याचा आरोप करणारा गौरव पाटील याचीही भूमिका संशयास्पद असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, अद्याप गौरव पाटील याला अटक झालेली नाही.

याशिवाय, एमपीसीचे दोन सहायक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे आणि विश्वेवर नकाते यांनाही अटक करण्यात आली आहे. तसेच, परीक्षार्थी ऋतुजा पाटील हीदेखील संशयाच्या भोवऱ्यात आहे. तिचे वडील अमृत पाटील आणि पेपर फुटीचा सूत्रधार प्रवीण पाटील यांनाही पोलिसांनी अटक केली आहे. या सगळ्यांच्या पोलीस चौकशीतून आता पेपरफुटीसंदर्भात महत्त्वाची माहिती आणि इतर धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. या सगळ्यांना बुधवारी कोर्टात हजर केले असता त्यांना २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# नियम तोडाल तर कारवाई होणारच : मुंढेंचा इशारा, सणासुदीत भेसळयुक्त विक्रेत्यांवर एफडीएची नजर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – 'अन्न व औषध प्रशासन विभाग हा राज्यातील १२ कोटींहून अधिक जनतेशी थेट जोडला गेला आहे.

त्यामुळे जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे हे कर्तव्य असून फाईव्ह स्टार असो वा स्ट्रीट फूड, प्रत्येकाला अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. मात्र अन्न सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष तर कारवाई अटळ, असा थेट इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. वर्षांच्या १२ महिने प्रत्येक धर्मांचे सण येत असतात. त्यामुळे सणासुदीच्या काळात भेसळयुक्त मिठाई विक्री करणाऱ्यांवर एफडीची करडी नजर असणार आहे. त्यामुळे याबाबत उद्या गुरुवारी नियमावली जारी करण्यात येईल, असे ही ते म्हणाले. 'मुंबई प्रेस क्लब' येथे बुधवारी आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी त्यांनी अन्न सुरक्षा, मिठाई, शालेय पोषण आहार, औषधे, रक्तपेढ्या आणि सणासुदीतील तपासणी मोहिमेबाबत अन्न व औषध प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांना आतापर्यंत ७०० हून अधिक नोटिसा बजावण्यात आल्या असून सुमारे १०० आस्थापनांनी त्याविरोधात अपील केले आहे. मात्र कारवाई करताना कोण प्रभावशाली आहे, कोण मोठा व्यावसायिक आहे किंवा कोणाची राजकीय पाठराखण आहे, याचा विचार केला जात नाही.

# चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी विविध यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, सुनेत्रा पवारांचे निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे** – चाकण परिसरातील विविध समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा आणि संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे.

चाकणच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने कामाचा रोडमॅप तयार केला असून, समितीला आवश्यक त्या सूचना व मागण्या ऐकून घेऊन काम करण्यास पूर्ण सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज केले. शासकीय विश्रामगृह येथे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी चाकण परिसरातील विविध प्रश्न तसेच चाकणच्या सर्वांगीण विकासासाठी गठित उच्चस्तरीय समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला.

त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खेड–आळंदीचे आमदार बाबाजी काळे,उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, पीएमआरडीए आयुक्त डॉ.अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी–चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम उपस्थित होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, चाकणच्या समस्या सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा एकाच व्यासपीठावर आल्या असून, ही सकारात्मक बाब आहे.

समितीच्या माध्यमातून विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करून त्यावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात येत आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

सुरक्षेसाठी १०० कर्मचारी नियुक्त चाकण परिसरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहतुकीचे वाढते प्रमाण लक्षात घेता सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे.

## मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्ताने

# ईद-ए-मिलाद निमित्ताने शहरात जुलूस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)








**वरुड** – मोहम्मद पैगंबर हे अल्लाहचे अंतिम प्रेषित होते. इस्लामच्या धारणेनुसार अल्लाहने त्यांच्यामार्फत कुराण हा धर्मग्रंथ लोकांपर्यंत पोहोचवला. त्यामुळे त्यांना नबी, रसूल आदी नावांनीही संबोधित केले जाते. इस्लाममध्ये ईद–ए–मिलाद हा सर्वांत मोठा दिवस असल्याचे मानले जाते.

वरुड शहरात ईद–ए–मिलाद पारंपरिक पद्धतीने साजरी केली जाते. त्यामुळे ती वैशिष्ट्यपूर्ण ठरते. ईदनिमित्त मोठ्या प्रमाणात धार्मिक विधी केले जातात तसेच शहरातील नया दायरा परिसरातील ईदगाह येथून मिरवणुक अर्थात जुलूस काढण्यात येतो. या भव्य जुलूसमध्ये मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात. या जुलूसाची सांगता ईदगाह येथे करण्यात येते. इस्लामच्या शिकवणीनुसार जुलूसनिमित्त सर्वत्र सुख–शांती नांदावी, मानवाची सर्व त्रासांपासून सुटका व्हावी, यासाठी प्रार्थना करण्यात येते. सध्या शहरात ईद–ए–मिलादनिमित्त उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. जुलूसमध्ये सहभागी झालेल्या विविध संघटनांमार्फत नाश्ता, थंड पेय, शरबत व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. शहरातील न.प.जवाहर मंदीर परिसरापासुन ते चुडामनी नदीपात्रापर्यंत परिसरामध्ये प्रचंड रोषणाई व सजविण्यात आले होते. ईदगाह येथून निघालेली मिरवणुक शहराच्या मुख्य मार्गाने फिरवुन वि.दा.सावरकर चौकातून पुन्हा नया दायरा परिसरामध्ये आणण्यात येवुन ईदगाह येथेच जुलूसची सांगता करण्यात आली. सकाळपासुन वरुड पोलिस स्टेशनचे ठाणेदार अशोक लांडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

